ePaper “नव्या निजामांना घरी बसवण्याची वेळ आली आहे,”: अमित शाह



| वर्ष - 7 । अंक - 289 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 6 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- अश्विनने सांगितला टर्निंग पॉईंट
- मी लग्नात नाचले नाही
- गडकरींकडून मोदी सरकारचं कौतुक
- कार्यकर्ता हाच विजयाचा मंत्र

## माता-बाल मृत्यू कमी करण्यासाठी

# महापालिका प्रशासनाचे ‘लक्ष्य’ साध्य!

### » नवीन थेरगाव रुग्णालयाची उल्लेखनीय कामगिरी

।पिंपरी।महाईन्यूज प्रतिनिधी।

**नवीन थेरगाव रुग्णालय येथील प्रसूतीकक्ष व शस्त्रक्रिया विभागाला केंद्र शासनाच्या ‘लक्ष्य’ या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता प्रमाणपत्र मिळालेले आहे, अशी माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे यांनी दिली आहे.**






मातामृत्यु आणि बालमृत्यु दर कमी करण्यासाठी प्रसूतीकक्ष व शस्त्रक्रिया विभागामधील गुणवत्ता वाढ तसेच मातांना सुरक्षित प्रसुती आणि मातृत्वाचा आनंद घेता यावा यासाठी देण्यात येणाऱ्या सुविधांच्या गुणवत्तेसाठी केंद्र शासनाच्या वतीने ‘लक्ष्य’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयातील प्रसूतीकक्ष आणि प्रसूती शस्त्रक्रिया विभागाला केंद्रस्तरीय पथकाने नोव्हेंबर २०२३ रोजी भेट देऊन परीक्षण केलेले होते.

केंद्र शासनाव्दारे “प्रसुतीगृह गुणवत्ता सुधारणा कार्यक्रम – लक्ष्य” राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत रुग्णालयामधील प्रसुतीगृह व शस्त्रक्रिया गृह यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्याचा मानस आहे, जेणेकरुन गरोदर माता, प्रसुत माता व नवजात शिशु यांना देण्यात येणाऱ्या सुविधांच्या दर्जामध्ये सुधारणा होणार आहे.

स्त्रीला सन्मापूर्वक मातृत्त्वाची काळजी प्रदान करण्याचा उद्देश... प्रसूतीचा सुरक्षित आणि आनंददायी अनुभव प्रत्येक गर्भवती महिलेला मिळावा अशी तिची आणि तिच्या कुटुंबाची इच्छा असते. यासाठी देशातील मातामृत्यु आणि बालमृत्यु दर कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने ‘लक्ष्य’ (लेबर रूम क्वालिटी इम्प्रोव्हमेंट : इनिशिएटीव्ह) हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. सरकारी वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, महापालिका रुग्णालये इत्यादी रुग्णालयातील प्रसुतीकक्ष आणि प्रसूती शस्त्रक्रिया विभागामध्ये देण्यात येणाऱ्या सुविधांची गुणवत्ता सुधारावी तसेच प्रसूतीदरम्यान आणि प्रसूतीनंतर प्रत्येक स्त्रीला सन्मानपूर्वक आणि उच्च दर्जाची मातृत्व काळजी प्रदान केली जावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

#### वैद्यकीय विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका...

» प्रसूतीकक्ष व शस्त्रक्रिया विभागाकरिता केंद्र शासनाच्या ‘लक्ष्य’ या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता प्रमाणपत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन भोसरी रुग्णालयास (प्रसूतीकक्ष व शस्त्रक्रिया विभागाकरिता) १७ ऑक्टोबर २०२२ रोजी आणि ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे, आकुर्डी रुग्णालयातील प्रसूती कक्षाकरिता १६ मे २०२३ रोजी यापूर्वी प्राप्त झालेले आहे. तसेच ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे, आकुर्डी रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाकरिता राज्यस्तरीय परीक्षण २० डिसेंबर २०२३ रोजी पूर्ण झालेले असून राष्ट्रीय प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीची कार्यवाही चालू आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासन यांचेकडील ‘लक्ष्य’ या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी महापालिकेच्या वैद्यकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी आणि नवीन थेरगाव रुग्णालयातील जेष्ठ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व सर्व कर्मचारी यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

---

# डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपूल प्रगतीपथावर!

### » महापालिका आयुक्तांची माहिती : वाहतूक समस्या

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी परिसरातील नागरिकांची बऱ्याच वर्षांची वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील डेअरी फार्म येथील मुंबई-पुणे रेल्वे फाटकावर ५६५ मीटर लांबीचा रेल्वे उड्डाणपूल उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.**



दापोडी-निगडी रस्त्याला पॉवरहाऊस चौकाशी जोडणारा हा उड्डाणपूल झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या वाढत्या मागणीला विचारात घेऊन उभारण्यात येत आहे. चार पदरी असणाऱ्या या उड्डाणपुलामध्ये छोट्या वाहनांसह अवजड वाहने पेलण्याचीही क्षमता असणार आहे. हा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर पिंपरी, पिंपळे सौदागर, रहाटणी आणि आसपासच्या भागातील प्रवाशांचा प्रवास सोयीस्कर होणार आहे.

या प्रकल्पामुळे नागरिकांना सुविधा, सुरक्षितता आणि इंधन बचतीच्या दृष्टीने फायदा होणार आहे. रेल्वे उड्डाणपूल ही पिंपरी आणि आजूबाजूच्या परिसरातील लोकांची दीर्घकाळापासूनची मागणी होती. उड्डाणपुल नसल्याने या भागातील नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे आणि रेल्वे फाटकावर दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. या उड्डाणपुलाच्या उभारणीनंतर नागरिकांच्या या समस्या दूर होणार असून पुणे मुंबई महामार्गावर तसेच तुकाराम नगर मेट्रो स्टेशनपर्यंत जलद आणि सहज पद्धतीने प्रवास करण्यासाठी मदत होणार आहे.



“ पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपूल हा शहराच्या निरंतर विकासाला पाठिंबा देणाऱ्या महत्त्वपूर्ण पायाभूत प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याच्या महापालिकेच्या व्यापक उपक्रमाचा एक भाग आहे. येत्या काही महिन्यांत उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर येथील रहिवासी कमी वेळेत सुधारित दळणवळण तसेच शाश्वत शहरी वातावरणाचे साक्षीदार होऊ शकतात.

**– शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

#### 64 झाडांचे करण्यात येणार पुनर्रोपण

» संरक्षण खात्याच्या जमिनीवर असलेल्या झाडांचे मूल्यांकन करून वृक्ष प्राधिकरण समितीने पुनर्रोपण तसेच वृक्षतोडीस मान्यता दिली आहे. यामध्ये मुख्यतः सुबाभूळ, बाभूळ, गुलमोहर आणि रेनट्री या वृक्षांचा समावेश आहे. तसेच महापालिकेच्या वतीने ६४ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे.

# सुळेंच्या प्रचारार्थ युगेंद्र पवार मैदानात!

## दहशतीचे वातावरण असेल तर माझ्याशी संपर्क करा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"बारामतीत दहशतीचा आणि वेगळ्या प्रकारचे राजकारण असेल तर माझ्याशी संपर्क करा, मग मी बघतो", असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्याविरोधात सख्ख्या पुतण्यानेचं म्हणजेच युगेंद्र पवार यांनी दंड थोपटले आहेत. युगेंद्र पवारांनी खासदार सुप्रिया सुळेंच्या प्रचारार्थ गावभेट दौरे सुरु केले आहेत. उंडवडीत त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.**



सुप्रिया सुळे यांच्या गटासोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांना धमकावले जात असल्याची चर्चा सध्या बारामती सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर युगेंद्र पवारांनी विरोधकांना आव्हान दिलं आहे. बारामतीत वेगळ्या प्रकारचं राजकारण होत आहे. बारामतीकरांनी असे दहशतीचं राजकारण कधी बघितलं नाही. कोणी तुम्हाला फोन करून धमकावले जात असेल तर थेट माझ्याशी संपर्क करा, पुढचं मी बघतो, असं युगेंद्र पवार यांनी म्हटलं आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदा पवार विरुद्ध पवार अशी लढाई पाहायला मिळणार आहे. अजित पवार गटाकडून बारामती लोकसभेसाठी सुनेत्रा पवार यांना उमेदवार देण्यात येणार असल्याचे निश्चित आहे. तर दुसरीकडे शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे मैदानात उतरणार आहेत. दरम्यान, अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार सुप्रिया सुळे (Supriya Sule) यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत.युगेंद्र पवार यापूर्वी कधीही राजकारणात सक्रिय नव्हते. शिवाय, त्यांच्या नावाच्या चर्चा देखील पाहायला मिळत नव्हत्या. मात्र, शरद पवार समवेत एका कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली. त्यानंतर ते चर्चेत आले. दरम्यानच्या काळात बऱ्याच घडामोडी घडल्या आणि आता ते सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत. अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार यांचे युगेंद्र पवार चिरंजीव आहेत. युगेंद्र पवार हे विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थेचे खजिनदार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंडखोरी केल्यानंतर राष्ट्रवादीत दोन गट पडले. त्यानंतर निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्या गटाला दिलं. तर शरद पवार यांच्या गटाला तुतारी हे चिन्ह आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' हे नाव दिलं. त्यामुळे दोन गट तर पडलेच. मात्र, पवार कुटुंबातील महिलांमध्येच लोकसभेच्या निवडणुकीसाठी चूरस पाहायला मिळणार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदा पवार विरुद्ध पवार अशी लढाई पाहायला मिळणार आहे. अजित पवार गटाकडून बारामती लोकसभेसाठी सुनेत्रा पवार यांना उमेदवार देण्यात येणार असल्याचे निश्चित आहे. तर दुसरीकडे शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे मैदानात उतरणार आहेत. दरम्यान, अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार सुप्रिया सुळे (Supriya Sule) यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत.युगेंद्र पवार यापूर्वी कधीही राजकारणात सक्रिय नव्हते. शिवाय, त्यांच्या नावाच्या चर्चा देखील पाहायला मिळत नव्हत्या. मात्र, शरद पवार समवेत एका कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली. त्यानंतर ते चर्चेत आले. दरम्यानच्या काळात बऱ्याच घडामोडी घडल्या आणि आता ते सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत. अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार यांचे युगेंद्र पवार चिरंजीव आहेत. युगेंद्र पवार हे विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थेचे खजिनदार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंडखोरी केल्यानंतर राष्ट्रवादीत दोन गट पडले. त्यानंतर निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्या गटाला दिलं.

### पवार विरुद्ध पवार अशी लढाई

सुप्रिया सुळे यांच्या गटासोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांना धमकावले जात असल्याची चर्चा सध्या बारामती सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर युगेंद्र पवारांनी विरोधकांना आव्हान दिलं आहे. बारामतीत वेगळ्या प्रकारचं राजकारण होत आहे. बारामतीकरांनी असे दहशतीचं राजकारण कधी बघितलं नाही. कोणी तुम्हाला फोन करून धमकावले जात असेल तर थेट माझ्याशी संपर्क करा, पुढचं मी बघतो, असं युगेंद्र पवार यांनी म्हटलं आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदा पवार विरुद्ध पवार अशी लढाई पाहायला मिळणार आहे. अजित पवार गटाकडून बारामती लोकसभेसाठी सुनेत्रा पवार यांना उमेदवार देण्यात येणार असल्याचे निश्चित आहे.

# साखर कारखान्यांनी 2 हजार कोटींची एफआरपी थकविली

## 114 कारखान्यांकडे सुमारे दोन हजार कोटी रुपयांची रक्कम थकीत

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील २०६ पैकी ११४ कारखान्यांकडे सुमारे दोन हजार कोटी रुपयांची रास्त आणि किफायतशीर दराची (एफआरपी) रक्कम थकीत आहे. इथेनॉल उत्पादन, साखर निर्यातीवरील निर्बंध कायम आहेत. तसेच साखरेचा किमान विक्री दर स्थिर ठेवल्यामुळे कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत.**



राज्यात यंदाच्या गळीत हंगामात २०६ कारखाने सुरू आहेत. या कारखान्यांनी ८२४.८० लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यापोटी एकूण देय एफआरपी २५,५०६ कोटी रुपये आहे. कारखान्यांनी फेब्रुवारीअखेर एफआरपी २३,४४१ कोटी रुपयांची एफआरपी दिली आहे. अद्यापही ११४ साखर कारखान्यांकडे २०६५ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे.यंदाच्या हंगामात इथेनॉल उत्पादनावर निर्बंध आहेत. साखरेच्या निर्यातीवर निर्बंध आहेत. साखरेचा किमान साखर विक्री प्रति किलो ३१ रुपयांवर स्थिर आहे. अशा अवस्थेत केंद्र सरकारने १०.२५ टक्के साखर उतारा असलेल्या कारखान्यांना प्रति ३४०० रुपये एफआरपी देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे साखर कारखान्यांची कोंडी झाली आहे. एफआरपीची रक्कम देण्यासाठी कारखान्यांना कर्ज काढावे लागत आहे. राज्य सहकारी बँकेकडून कारखान्यांना साखर तारण कर्ज दिले जाते. बँकेने बाजारात साखरेचे दर घटल्यामुळे साखरेच्या मूल्यांकनात प्रति क्विंटल १०० रुपयांची घट केली आहे. बँक आता प्रति क्विंटल २९७० रुपये इतकी उचल देणार आहे. त्यामुळे कारखान्यांची आर्थिक कोंडी झाल्याची स्थिती आहे.इथेनॉल निर्मितीवर, साखर निर्यातीवर निर्बंध आहेत. साखरेचा किमान विक्री दर वाढविलेला नाही. कारखाने आर्थिक अडचणीत असताना केंद्र सरकारने ३४०० रुपये प्रति टन एफआरपी देण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र सरकारने तातडीने साखरेचा विक्री दर न वाढविल्यास राज्यातील संपूर्ण साखर कारखानदारीच अडचणीत येणार आहे.

### 3400 रुपये एफआरपी देण्याचे आदेश

राज्यात यंदाच्या गळीत हंगामात २०६ कारखाने सुरू आहेत. या कारखान्यांनी ८२४.८० लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यापोटी एकूण देय एफआरपी २५,५०६ कोटी रुपये आहे. कारखान्यांनी फेब्रुवारीअखेर एफआरपी २३,४४१ कोटी रुपयांची एफआरपी दिली आहे. अद्यापही ११४ साखर कारखान्यांकडे २०६५ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे.यंदाच्या हंगामात इथेनॉल उत्पादनावर निर्बंध आहेत. साखरेच्या निर्यातीवर निर्बंध आहेत. साखरेचा किमान साखर विक्री प्रति किलो ३१ रुपयांवर स्थिर आहे. अशा अवस्थेत केंद्र सरकारने १०.२५ टक्के साखर उतारा असलेल्या कारखान्यांना प्रति ३४०० रुपये एफआरपी देण्याचे आदेश दिले आहेत.

# खासदार श्रीरंग बारणे यांचे अपयश अन् ताथवडे, पुनावळेकरांची 'कोंडी'!

## गेल्या 10 वर्षांत प्रश्न सुटला नाही : सर्वसामान्य प्रवासी, नागरिकांना मनस्ताप

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ताथवडे, पुनावळे येथील पुणे-मुंबई महामार्गावरील अंडरपासची उंची कमी आणि अरुंद रस्ता असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. परिणामी, सर्वसामान्य प्रवासी आणि नागरिकांना मन:स्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे सातत्याने मागणी करुनही हा प्रश्न 'जैसे थे' आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.**





मावळ लोकसभा मतदारसंघातून पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ जातो. या रस्त्यावर प्रचंड रहदारी आहे. पुनावळे, ताथवडे, वाकड तसेच देहूरोड, रावेत येथील अंडरपास व ओव्हर ब्रीजची उंची आणि रुंदी कमी आहे. त्यामुळे तिथे वाहतूक कोंडी नियमितपणे होते. वाहतुकीची ही समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाचा सुधारीत डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) करण्याची आवश्यकता आहे. मात्र, राजकीय इच्छाशक्ती आणि पाठपुरावा अभावी हा प्रश्न प्रलंबित आहे.

पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड ते चांदणी चौकापर्यंतचे काम 'सुवर्ण चतुष्कोण' या रस्तेबांधणी प्रकल्पाअंतर्गत हाती घेतले होते. हे काम पूर्ण करण्याची आणि त्याच्या देखभालीची जबाबदारी रिलायन्सला दिली होती. परंतु, या मार्गावरील काम ठेकेदाराने पूर्ण केले नाही. अनेक ठिकाणी अर्धवट काम आहे. देहूरोड आणि वाकड पर्यंतचे क्षेत्र पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येत आहे. वाकड ते चांदणी चौकापर्यंतचे क्षेत्र पुणे महापालिका हद्दीत आहे. या राष्ट्रीय महामार्गावर देहूरोड ते चांदणी चौक (पुणे) दरम्यान १२ अंडरपास आणि ओव्हरब्रीज आहेत. त्यातील मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड, रावेत, पुनावळे, ताथवडे आणि वाकड येथील अंडरपास व ओव्हर ब्रीजची उंची आणि रुंदी कमी आहे. त्यामुळे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना आपल्या १० वर्षांच्या कार्यकाळात हा प्रश्न सोडवता आला नाही, ही बाब अधोरेखित झाली आहे.



> पुणे-महामार्गालगत असलेल्या गावांमध्ये सोयी-सुविधा देण्यात गेल्या १० वर्षांपासून सत्तेत असतानाही विद्यमान खासदार श्रीरंग बारणे अपयशी ठरले आहेत. ताथवडे, पुनावळे अंडरपास हा मुद्दा अनेकदा चर्चेत आला. मात्र, त्यावर कार्यवाही शून्य आहे. "केवळ पत्रकबाजी करण्यात नेते व्यस्त आणि सामान्य नागरिक वाहतूक कोंडीने त्रस्त" अशी स्थिती आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे.
> **- संजोग वाघेरे-पाटील, संघटक, शिवसेना उबाठा, मावळ..**

### लोकसंख्या वाढली... सुविधा नाहीत...

ताथवडे, पुनावळे, रावेत, मामुर्डी, किवळे या पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली आहे. सोसायटीधारकांची संख्या सुमारे ७ ते ८ लाखांच्या घरात आहे. औद्योगिक कंपन्या, शिक्षण संस्था, व्यावसायिक अस्थापनांची संख्याही जास्त आहे. त्यामुळे मुंबई, पुणे आणि हिंजवडी आयटी पार्कमधून पिंपरी-चिंचवडमध्ये प्रवेश करण्यासाठी या भागातून मुख्य रस्त्यांना जोडणारे अंतर्गत रस्ते प्रशस्त नाहीत. त्यामुळे वाहतूक कोंडीसारखी समस्या गंभीर झाली आहे. या भागातील अंडरपासमध्ये पावसाळ्यात पाणी साचते. त्यामुळे पुणे-मुंबई महामार्गाच्या अलिकडे आणि पलिकडे जाणाऱ्या प्रवाशांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागतो. जाणाऱ्या नोकरदारवर्गाची वाहने, शालेय वाहतूक करणाऱ्या बस, खासगी वाहने यांसारख्या वाहनांची संख्या या भागात वाढली आहे. दुसरीकडे रस्त्यांची स्थिती मात्र बदललेली नाही. परिणामी रोज सकाळ- संध्याकाळ वाहतूक कोंडी होत आहे.

---

# शहरातील १३ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द!

## 'मॅट'चा दणका : बदली आदेशाची पडताळणी करण्याची सूचना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील १३० पोलिस निरीक्षकांच्या इतर घटकांमध्ये बदल्या केल्या होत्या. त्याबाबत काही अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणकडे (मॅट) धाव घेतली. मॅटच्या आदेशानंतर बदली झालेल्या ६५ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या रद्द केल्या. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील १३ पोलिस निरीक्षकांचा समावेश आहे.**




मॅटने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बदली आदेशाची पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार २१ फेब्रुवारी रोजी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित घटक प्रमुखांची बैठक घेतली. त्यानंतर पुणे शहर (२), पिंपरी-चिंचवड (१३), ठाणे शहर (७), विशेष पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र (१) अशा एकूण २३ पोलिस निरीक्षक जे २१ डिसेंबर २०२३ रोजी संबंधित घटकात कार्यकारी पदावर कार्यरत होते. त्यांना आयोगाच्या निकषाप्रमाणे जिल्ह्याबाहेर बदली करण्यापासून सवलत असल्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर महासंचालक कार्यालयाकडून देखील ४२ पोलिस निरीक्षकांची बदलीबाबत पडताळणी केली. त्यानंतर एकूण ६५ पोलिस निरीक्षकांची बदली रद्द करण्याचे आदेश दिले. अपर पोलिस महासंचालक (आस्थापना) संजीव कुमार सिंघल यांनी याबाबतचे आदेश दिले.

### बदली रद्द झालेले पोलिस निरीक्षक

शंकर डामसे, शैलेश गायकवाड, शंकर बाबर, ज्ञानेश्वर साबळे, दीपाली धाडगे, प्रसाद गोकुळे, सुनील पिंजण, विश्वजित खुळे, बाळकृष्ण सावंत, दीपक साळुंखे, शहाजी पवार, अरविंद पवार, अनिल देवडे.

### ...यांचीही बदली झाली रद्द

पिंपरी-चिंचवड पोलिस दलात इतर घटकातून बदलून आलेल्या १३ अधिकाऱ्यांची बदली रद्द झाली. यात नागपूर शहर दलातील पोलिस निरीक्षक वैजयंती मांडवधरे, विश्वनाथ चव्हाण, विनोद चौधरी, बापू ढेरे, दीपक गोसावी, अमित डोळस, संग्राम शेवाळे, अमोल देशमुख, राजेंद्रकुमार सानप, बबन येडगे, भारत कऱ्हाडे, तसेच ठाणे शहर दलातील निरीक्षक मनोज शिंदे आणि डीआयजी गडचिरोलीचे पोलिस निरीक्षक अमोल फडतरे यांची पिंपरी-चिंचवड दलात बदली झाली होती. त्यांचीही बदली रद्द झाली.




# नव्या फौजदारी कायद्यांनी संधी गमावली!

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीमध्ये एक अतार्किक सातत्य असतं. नवीन फौजदारी कायदे करून भारतातून मेकॉलेच्या शेवटच्या खुणा पुसून टाकायचा विचारही त्यातलाच. मेकॉलेनिर्मित तथाकथित कारकून घडवणारी शिक्षण पद्धती या सरकारने बंद केली आणि २०२० मध्ये नवीन शैक्षणिक धोरण लागू केले.**

आता मेकॉलेनिर्मित दंड संहिता बदलून ब्रिटिश साम्राज्यशाहीचे अवशेष असलेले कायदे रद्द करण्याकडे वाटचाल सुरू आहे. संसदेने तीन नवीन फौजदारी संहिता विधेयके मंजूर केली असून त्यांना राष्ट्रपतींनीही २५ डिसेंबर २०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. लवकरच हे कायदे अमलात आणण्याची प्रक्रिया सुरू होईल. त्यासाठी देशभर सहमती (?), कायद्याचे नियम तयार करून मान्य करणे, न्यायसंस्था आणि कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण, वकील वर्गाचे प्रशिक्षण आणि कदाचित एखादी परीक्षा, मग कायदे लागू करण्याची अधिसूचना काढणे, हे सर्व क्रमाने करावे लागेल. नोटबंदीप्रमाणे आज रात बारा बजेसे नये कानून अशी घोषणा केली जाऊ शकतेच. काही केले तरी मोठ्या प्रमाणात जनआक्रोश होणार हे नक्की! नवीन फौजदारी कायदे आणण्यामागचे सरकारी उद्देश सांगताना सरकार अनेक गोष्टी सांगेल. उदा. साम्राज्यवादी कायदे बदलणे, सुसूत्रता आणणे, कायद्याचा धाक वाढवणे,



कालबाह्य कलमे काढून टाकणे, न्याय व्यवस्था गतिमान करणे, तंत्रज्ञानामुळे झालेले बदल समाविष्ट करणे इत्यादी. पण मूळ अंतस्थ उद्देश हा पोलिसी राज्यव्यवस्था मजबूत करणे आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचा संकोच करणे हाच आहे हे नक्की. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी २०४ घरकुल मार्ट सुरू करण्यात आले. वाळूच्या उपलब्धतेसाठी ८६६ सॅण्ड बँकची निर्मिती केली. अशा प्रकारे अभियान कालावधीत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांतर्गत चार लाख २२ हजार २६६ घरकुले पूर्ण करण्यात आली. ११ हजार ५७० प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३३ हजार ४०७ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. २९ हजार ६९ गवंडयांचे मूल्यांकन करण्यात आले. इंदिरा आवास योजनेअंतर्गत २६ हजार ९४६ घरकुल लाभार्थींना सिंगल पेज एन्ट्रीनुसार तात्काळ निधी वितरित करून पाच हजार ८४ घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थींचे जीवनमान उंचावावे यासाठी शासनाच्या विविध योजनांशी जोडून घरकुलासह इतर शासकीय योजनांचाही लाभ देण्यात आला. यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून नऊ कोटी नऊ लाख ७९ हजार ३८२ मनुष्य दिवस रोजगार, स्वच्छ भारत मिशन ग्रामीणमधून तीन लाख ४४ हजार ११७ शौचालये, जलजीवन मिशनमधून दोन लाख ९५ हजार ६८ घरांना नळाने पिण्याचे पाणी, प्रधानमंत्री उज्वला योजनेतून तीन लाख १५ हजार १२४ गॅस जोडण्या, सौभाग्य योजनेतून तीन लाख ३० हजार ५०४ विद्युत जोडण्या, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशनमधून ९६ हजार १२२ उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिसरण (महाऊर्जा) मधून पाच लाख ४९ हजार ६६८ ऊर्जेच्या बचतीची साधने इ. शासकीय योजनांचा लाभ घरकुल लाभार्थींना देण्यात आला.या अभियान कालावधीत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये वाळूला पर्याय वापरून ४० हजार ३१८ घरकुलांची निर्मिती, नवीन तंत्रज्ञान वापरून ५७ हजार ३२२ घरकुलांची निर्मिती, ७० हजार ३८९ मॉडेल घरांची निर्मिती, दोन लाख ९३ हजार ६८९ घरकुलांवर पत्नीचे नाव व ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीत नोंद घेण्यात आली. अशा प्रकारे विविध उपक्रम राबवून राज्यात या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. गेल्या वर्षी राबविण्यात आलेल्या 'अमृत महाआवास अभियान २०२२-२३'च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांना आलेला वेग पाहता आणि गुणवत्तावाढ लक्षात घेता, यावर्षीही शासनाने २० नोव्हेंबर २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत 'महा आवास अभियान २०२३-२४' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी या अभियानाचा राज्यस्तरीय प्रारंभ झाला.

## संपादकीय »

### उपभोगशून्य वाढ!

***देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट- जीडीपी) आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत ८.४ टक्के इतकी वाढ नोंदली गेली ही आनंदवार्ताच. ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर या तिमाहीचा हा तपशील नुकताच जाहीर झाला.***

या तिमाहीच्या उत्तम कामगिरीची ही आनंदवार्ता निवडणुकांच्या तारखा घोषित होण्याआधी प्रसृत झाली याचा 'अर्थाअर्थी' काही संबंध आहे असा संशय घेण्याचे काही कारण नाही. तसेच अधोगतीप्रमाणे प्रगतीचा अंदाज बांधण्यातही आपली रिझर्व्ह बँक अपयशी ठरली याबाबतही छिद्रान्वेषी दृष्टिकोनातून विचार करणे योग्य नाही. रिझर्व्ह बँकेच्या मते या तिमाहीत अर्थगती ६.५ टक्के असणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात ही वाढ ८.४ टक्के इतकी नोंदली गेली. म्हणजे साधारण दोन टक्क्यांनी आपल्याच रिझर्व्ह बँकेचा आपल्याच अर्थगतीबाबतचा कयास चुकला. ही काही टिंगल करावी अशी बाब नाही. कारण या तिमाहीबाबत अनेकांचे अंदाज चुकले. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत ८.४ टक्के इतकी वाढ नोंदली.

विकासकामांच्या नावाखाली जंगलाच्या मुळावर घाव घालणे हा सत्ताधाऱ्यांचा आवडीचा उद्योग. मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे अथवा आघाडीचे असो. अलीकडच्या काही दशकांतील घडामोडींवर नजर टाकल्यास उद्योगांत घट होण्याऐवजी वाढच झालेली दिसते.

# उद्योगांवर कृपादृष्टी, जंगलांवर वक्रदृष्टी!

केंद्रीय पर्यावरणमंत्री म्हणून जयराम रमेश यांची कारकीर्द वगळली तर सरकारांची भूमिका जंगलप्रेमी अशी कधी दिसली नाही. तरीही यूपीए एक व दोनच्या कार्यकाळात असे पर्यावरण विरोधी निर्णय घेताना थोडी तरी चाड बाळगली जात असे. पायाभूत सुविधा व उद्योगांचे मार्ग मोकळे करताना पर्यावरणाला फार धक्का लागणार नाही याकडेही लक्ष दिले जाई. २०१४ नंतर मात्र या संवेदनशील मुद्द्याविषयीचा दृष्टिकोनच बदलला. विकासाची जबरदस्त भूक असलेल्या व उद्योगांची अपार काळजी करणाऱ्या सरकारने बहुमताच्या जोरावर कधी जुन्या कायद्यांची मोडतोड करत तर कधी पूर्णपणे बेकायदा कृती करत जंगलांवर कुऱ्हाड चालवण्याचे प्रयत्न अतिशय वेगाने सुरू केले. ते कोणत्या थराला गेलेले आहेत हे समजून घ्यायचे असेल तर दोन ताज्या घडामोडींकडे बारकाईने बघायला हवे. त्यातली पहिली सर्वोच्च न्यायालयाशी संबंधित. गेल्यावर्षी केंद्र सरकारने आहे ते जंगल राखण्यासाठी



वरदान ठरलेल्या वनसंवर्धन कायद्यात बदल केले. त्यानुसार पायाभूत सुविधा व देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेली कामे करण्यासाठी वनांशी संबंधित कोणत्याही कायद्याची मंजुरी घ्यायची गरज नाही.

हा बदल तातडीने अमलात आणता यावा यासाठी देशभरातील एक लाख ९९ हजार चौरस किलोमीटर वनजमीन गृहीत धरण्यात आली. म्हणजे या क्षेत्रात सरकार कसलीही परवानगी न घेता सोयीसुविधा उभारू शकते. हे धक्कादायक होते. याशिवाय याच कायद्यात दुसरा बदल सुचवण्यात आला तो जंगल व वनजमिनीच्या व्याख्येसंदर्भातील आहे. जंगल कशाला म्हणायचे व वनजमीन कोणती हे ठरवण्याचे अधिकार सरकारने स्वत:कडे घेतले. हे दोन्ही बदल पर्यावरणाचे संतुलन बिघडवणारे होतेच शिवाय संघराज्यीय संकल्पनेला छेद देणारे होते.मुळात जंगल व जमीन हे दोन्ही विषय समवर्ती सूचीत समाविष्ट आहेत. त्यावर केंद्राप्रमाणेच राज्यांचाही अधिकार आहे. या बदलामुळे राज्यांच्या अधिकारावर गदा आणली गेली. मूळ कायद्यानुसार पायाभूत सुविधा अथवा उद्योगांसाठी जंगल वा वनजमीन द्यायची असेल तर राज्यांची परवानगी घेणे अथवा मत जाणून घेणे आवश्यक होते. मात्र राज्याला बेदखल करून केंद्राला शक्तिशाली करण्याचा प्रयत्न केला गेला. संसदेने या बदलाला मान्यता दिली तेव्हाच हे प्रकरण न्यायालयात जाईल याची कल्पना साऱ्यांना होती. सर्वोच्च न्यायालयाने या बदलांना स्थगिती देतानाच जे भाष्य केले ते पर्यावरणप्रेमींना दिलासा देणारे आहेच शिवाय सरकारचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन किती पोकळ आहे हेही दर्शवणारे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजप कार्यकर्ता हाच विजयाचा मंत्र

## भाजपचे पुढील 25 वर्षांतील निवडणुकांमधील विजयाचे लक्ष्य

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्षातील चार पिढ्यांच्या संघर्षामुळेच पक्षाला आता चांगले दिवस आले आहेत. २०२४ ची निवडणूक तर जिंकूच. मात्र, भाजपचे पुढील २५ वर्षांतील निवडणुकांमधील विजयाचे लक्ष्य आहे, अशी महत्त्वाकांक्षा केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी आज येथे व्यक्त केली.**



लोकसभा मतदारसंघाच्या आढावा बैठकीत मंगळवारी ते अकोल्यात बोलत होते. व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर उपस्थित होते. अमित शाह यांनी आपल्या ४५ मिनिटांच्या भाषणात लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांना निवडणुकीतील विजयाचा कानमंत्र दिला. पुढे ते म्हणाले, "कार्यकर्ता भाजपची संपत्ती असून कार्यकर्त्यांची भेट घेतल्यामुळे नवी ऊर्जा प्राप्त होते. पक्ष विस्तारासोबत देशहितासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पाईक म्हणून कार्यरत आहे. भाजप सकारात्मकपणे निवडणूक लढते. पक्षाला जनतेला अभिप्रेत नेता प्राप्त झाला. प्रत्येक वार्डात व सर्वच क्षेत्रामध्ये काम करणारा भाजपचा कार्यकर्ता हा विजयाचा मंत्र आहे. भाजप २०२४ ची निवडणूक जिंकणार आहेच. मात्र, पक्षाने पुढील २५ वर्षांतील सर्व निवडणुका जिंकण्याचे लक्ष्य ठेवले. पक्षातील चार पिढ्यांनी संघर्ष, तपस्या, कष्ट व बलिदानातून पक्ष विस्ताराचे कार्य केले. त्यामुळे पक्षाला चांगले दिवस आलेत. येणाऱ्या पिढीला अजून चांगले काम करता येण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कार्य सुरू आहे." पुढील ४० दिवसांत पक्षाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडा. लाभार्थी तसेच समाजातील सर्व घटकांना एकत्रित करण्याचे काम करा. काँग्रेसने देशात केवळ राजकारण करून नुकसान केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात नवीन समाजकारण, राजकारण व समाजातील प्रत्येक घटकासाठी विकासाचे कार्य सुरू आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ सर्व घटकांना देण्याचे काम केले. जाती, धर्मात कुठलाही भेदभाव न करता सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम केले. आता कल्पकतेने जनतेशी संवाद साधा, अशी सूचना त्यांनी केली. राष्ट्र निर्माण व पक्ष विस्तारासाठी आपल्या क्षेत्रातील मतदान वाढवा व भाजप-महायुतीचा प्रत्येक उमेदवार आपण स्वत: आहोत, असे समजून कामाला लागा, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाच्या राज्यातील कामगिरीची माहिती देऊन संघटनात्मक आढावा मांडला. यावेळी बुलढाणा जिल्हा लोकसभेचा आढावा डॉ. संजय कुटे, अकोला जिल्हा लोकसभेचा अहवाल भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, चंद्रपूर चंद्रकांत दुबे, अमरावती डॉ. अनिल बोंडे तर वर्धा लोकसभेचा अहवाल सुनील बट यांनी सादर केला. बैठकीचे सूत्रसंचालन रणधीर सावरकर, आभार प्रदर्शन अकोला लोकसभा प्रमुख अनुप धोत्रे यांनी केले.राज्यातील सर्व ४८ लोकसभेच्या जागांवर महायुतीचे उमेदवार जिंकण्यासाठी निर्धार करा, असा आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी दिला. अकोला येथे झालेल्या पक्षाच्या लोकसभा निवडणूक व्यवस्थापन समितीच्या व लोकसभा कोअर कमिटीच्या बैठकीत .शाह बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि निवडणूक व्यवस्थापन समिती, लोकसभा कोअर कमिटीचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत श्री.शाह यांनी अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ-वाशीम, वर्धा व चंद्रपूर या मतदारसंघांतील पक्षाच्या संघटनात्मक तयारीचा आढावा घेतला.यावेळी श्री.शाह म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ४०० पेक्षा अधिक जागांवर विजय मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे. पंतप्रधान मोदी यांचा हा संकल्प प्रत्यक्षात उतरवायचा असेल तर महाराष्ट्रातील सर्व जागांवर महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रत्येकाने झटून कामाला लागावे लागेल. कार्यकर्त्यांनी मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या आणि विकासकामांच्या आधारावर मते मागायची आहेत.

### विदर्भातील सर्व जागा जिंकू फडणवीस

» लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून ४५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा संकल्प करून विदर्भातील सर्व जागा महायुती जिंकणार आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत व्यक्त केला. विकास कामे करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा सातत्याने पक्ष विस्तारासाठी कार्यरत असतात. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात राम मंदिर, ३७० कलम रद्द, तीन तलाक आदींसह सर्वसामान्यांची इच्छापूर्ती झाली. आता कार्यकर्त्यांनी महायुती धर्माचे पालन करावे. एकदिलाने महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचा संकल्प घ्या, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# उद्धव ठाकरे अचानक शरद पवारांच्या भेटीला!

## लोकसभा निवडणुका, आचारसंहिता जाहीर व्हायला काही दिवस उरले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबईतील 'सिल्व्हर ओक' निवासस्थानी दाखल झाले आहेत. लोकसभा निवडणुका आणि आचारसंहिता जाहीर व्हायला अवघे काही दिवस उरले आहेत.**



महाविकास आघाडी आणि महायुतीचं जागावाटप अंतिम टप्प्यावर आहे. पण तरीही महाविकास आघाडीचा काही जागांवर तिढा अजूनही कायम आहे. या तिढ्यावर मार्ग काढण्यासाठी आता उद्धव ठाकरे स्वत: शरद पवार यांच्या भेटीला गेल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरु आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे देखील शरद पवार यांच्या भेटीला गेले आहेत. अंतिम टप्प्यात असलेल्या जागावाटपावर चर्चा करणं आणि दोन जागांबाबत जो तिढा कायम आहे त्यावर तोडगा काढण्यासाठी उद्धव ठाकरे आज सिल्व्हर ओकवर दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरेंकडे शिवसेनेच्या २३ मतदारसंघांची यादी आहे. ठाकरे गट २३ मतदारसंघांवर ठाम आहेत. यापैकी एक ते दोन जागा त्यांची मित्र पक्षाला सोडण्याची तयारी आहे. त्यामुळे ठाकरे गट २० ते २२ जागांवर निवडणूक लढवू शकतं.ठाकरे गट २३, शरद पवार गट १० आणि काँग्रेस १५ असं मविआच्या जागावाटपाचं सूत्र सध्या दिसत आहे. पण काही जागा मित्रपक्षांनादेखील सोडायच्या आहेत. काही जागांच्या आदलाबदलीचे विषय आहेत. विशेषत: कोल्हापूरचं प्रकरण हे प्रतिष्ठेचं बनलं आहे.

### राऊत यांनी आज नवा प्रस्ताव ठेवला

» काँग्रेस शाहू छत्रपती महाराज यांना उमेदवारी देऊ इच्छित आहे. तर ठाकरे गटाने अट घातली आहे की, तुम्हाला कोल्हापूर हवं असेल तर आम्हाला सांगली द्या. त्यानंतर खासदार संजय राऊत यांनी आज नवा प्रस्ताव ठेवला आहे. छत्रपती शाहू महाराजांनी हातात मशाल घेतला तर आम्ही त्यांचं स्वागत करु.

# गडकरींकडून मोदी सरकारचं कौतुक!

## » मनमोहन सिंग नेतृत्वातलं सरकार आंधळं : गडकरी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. अशात भाजपने निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. नागपूरमध्ये झालेल्या भायुमोच्या संमेलनात नितीन गडकरींनी काँग्रेसवर टीकेची तोफ डागली आहे. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातलं सरकार आंधळं, बहिरं आणि मुकं होतं अशी टीका त्यांनी केली आहे."१९४७ ला पंडित नेहरू हे देशाचे पंतप्रधान झाले. त्यांनी गरीबी हटवणार म्हटलं होतं. त्यानंतर इंदिरा गांधींनी गरीबी हटाव हा नारा दिला. त्यावेळी गरिबी हटली नाही. त्यानंतर राजीव गांधी आले, त्यांनीही हाच नारा दिला होता. त्यांच्यानंतर सोनिया गांधींच्या नेतृत्वात मनमोहन सिंग आले त्यांनीही हाच नारा दिला. एक असं सरकार दिल्लीत होतं, ज्या सरकारला डोळे होते पण दिसत नव्हतं, तोंड होतं पण बोलू शकत नव्हतं, कान होते पण ऐकू शकत नाही. मनमोहन सिंग सरकार हे मुकं, बहिरं आणि आंधळं होतं." अशी टीका गडकरींनी केली आहे.



नमो रोजगाराच्या माध्यमातून नितीन गडकरी यांनी मोदी सरकारच्या कार्यकाळाचं कौतुक आहे. मोदी सरकारला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. काँग्रेसच्या कार्यकाळाचे ६५ वर्षे आणि मोदींनी १० वर्षांत केलेला विकास याची तुलना करुन बघा. तुम्हाला कळेल मागच्या दहा वर्षांत उत्तम काम झालं आहे. हायवे, रस्ते, पोर्ट सगळ्या ठिकाणी तुम्हाला बदल दिसेल. नीती आयोगाने त्यांच्या अहवालात म्हटलं आहे की २५ टक्के गरीब हे दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले आहे. साडेचार कोटी लोकांनी बँकेत खातं उघडलं आहे. आपल्या युवकांना माहीत असेल आम्ही जेव्हा मिहान प्रकल्प आणला तेव्हा शरद पवार आणि काँग्रेस या प्रकल्पाला विरोध दर्शवत होते. मात्र मिहानमध्ये आता विदेशी गुंतवणूक झाली आहे. आता ६८ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे.युवकाच्या हाताला काम, शेतकरी कल्याण, उत्तम रुग्णालयं, उत्तम विद्यापीठं, उत्तम मार्ग, उत्तम शाळा या सगळ्या आम्ही उभ्या करत आहोत. सबका साथ सबका विकास या मंत्रानेच आम्ही पुढे चाललो आहोत. आज विदर्भात शेतकरी आत्महत्या करत नाहीत. कारण आपल्या सरकारने इथले बंद पडलेले सिंचन प्रकल्प आपण सुरु केले. लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. अशात भाजपने निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. नागपूरमध्ये झालेल्या भायुमोच्या संमेलनात नितीन गडकरींनी काँग्रेसवर टीकेची तोफ डागली आहे. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातलं सरकार आंधळं, बहिरं आणि मुकं होतं अशी टीका त्यांनी केली आहे."१९४७ ला पंडित नेहरू हे देशाचे पंतप्रधान झाले. त्यांनी गरीबी हटवणार म्हटलं होतं. त्यानंतर इंदिरा गांधींनी गरीबी हटाव हा नारा दिला. त्यावेळी गरिबी हटली नाही. त्यानंतर राजीव गांधी आले, त्यांनीही हाच नारा दिला होता. त्यांच्यानंतर सोनिया गांधींच्या नेतृत्वात मनमोहन सिंग आले त्यांनीही हाच नारा दिला. एक असं सरकार दिल्लीत होतं, ज्या सरकारला डोळे होते पण दिसत नव्हतं, तोंड होतं पण बोलू शकत नव्हतं, कान होते पण ऐकू शकत नाही. मनमोहन सिंग सरकार हे मुकं, बहिरं आणि आंधळं होतं." अशी टीका गडकरींनी केली आहे.

नमो रोजगाराच्या माध्यमातून नितीन गडकरी यांनी मोदी सरकारच्या कार्यकाळाचं कौतुक आहे. मोदी सरकारला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. काँग्रेसच्या कार्यकाळाचे ६५ वर्षे आणि मोदींनी १० वर्षांत केलेला विकास याची तुलना करुन बघा. तुम्हाला कळेल मागच्या दहा वर्षांत उत्तम काम झालं आहे. हायवे, रस्ते, पोर्ट सगळ्या ठिकाणी तुम्हाला बदल दिसेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हे स्पष्ट केलं आहे की आपल्याला आत्मनिर्भर व्हायचं आहे. सध्या आपली वाटचाल त्याच दिशेने सुरु आहे असंही गडकरी आपल्या भाषणात म्हणाले. तसंच मोदी सरकारचं कौतुक केलं आहे.लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. अशात भाजपने निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. नागपूरमध्ये झालेल्या भायुमोच्या संमेलनात नितीन गडकरींनी काँग्रेसवर टीकेची तोफ डागली आहे.

### काय म्हणाले नितीन गडकरी?

» मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातलं सरकार आंधळं, बहिरं आणि मुकं होतं अशी टीका त्यांनी केली आहे."१९४७ ला पंडित नेहरू हे देशाचे पंतप्रधान झाले. त्यांनी गरीबी हटवणार म्हटलं होतं. त्यानंतर इंदिरा गांधींनी गरीबी हटाव हा नारा दिला. त्यावेळी गरिबी हटली नाही. त्यानंतर राजीव गांधी आले, त्यांनीही हाच नारा दिला होता. त्यांच्यानंतर सोनिया गांधींच्या नेतृत्वात मनमोहन सिंग आले त्यांनीही हाच नारा दिला. एक असं सरकार दिल्लीत होतं, ज्या सरकारला डोळे होते पण दिसत नव्हतं, तोंड होतं पण बोलू शकत नव्हतं, कान होते पण ऐकू शकत नाही. मनमोहन सिंग सरकार हे मुकं, बहिरं आणि आंधळं होतं." अशी टीका गडकरींनी केली आहे.नमो रोजगाराच्या माध्यमातून नितीन गडकरी यांनी मोदी सरकारच्या कार्यकाळाचं कौतुक आहे. मोदी सरकारला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. काँग्रेसच्या कार्यकाळाचे ६५ वर्षे आणि मोदींनी १० वर्षांत केलेला विकास याची तुलना करुन बघा. तुम्हाला कळेल मागच्या दहा वर्षांत उत्तम काम झालं आहे.लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. अशात भाजपने निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे.

# सीईओ पराग अग्रवालसह इतरांनी मस्कला खेचलं कोर्टात

## » मस्क कोणावरही कारवाई करण्यासाठी आपली संपत्ती वापरतो

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

टेस्ला कंपनीचे सर्वेसर्वा एलॉन मस्क हे जगातील सगळ्यात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहेत. २०२२ साली जेव्हा त्यांनी एक्स (ट्विटर) हे ॲप विकत घेतले, तेव्हा त्यांनी कंपनीमध्ये अनेक मोठे बदल केले. त्यातील एक मोठा निर्णय म्हणजे कंपनीचे तत्कालीन सीईओ पराग अग्रवाल यांना काढून टाकणं हा होता. तर आता एक्स (ट्विटर) च्या काही माजी अधिकाऱ्यांनी एलॉन मस्कला कोर्टात खेचलं आहे.

ट्विटर खरेदी केल्यानंतर काही अधिकाऱ्यांना त्याने कामावरून काढून टाकलं होतं. तर आता या माजी अधिकाऱ्यांनी एलॉन मस्क विरोधात खटला दाखल केला आहे.यामध्ये कंपनीचे माजी सीईओ पराग अग्रवाल यांचाही समावेश आहे. माजी अधिकारी दावा करतात की, ऑक्टोबर २०२२ मध्ये एक्स (ट्विटर) वर नियंत्रण मिळवून मस्कने कंपनी USD ४४ अब्ज, USD ५४.२० प्रति शेअरमध्ये विकत घेतली होती. त्यांच्या योजनांमध्ये एक्स (ट्विटर)च्या संपादन किमतीवर एक वर्षाचा पगार आणि अनव्हेस्टेड



स्टॉक अवॉर्ड्स VALUED चा समावेश होता. पण, नोकरीवरून काढून टाकल्यानंतर भरपाई म्हणून दिली जाणारी रक्कम चक्क १२८ मिलियन डॉलर्स पेक्षा जास्त एलॉन मस्कने अजूनही दिली नसल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे आणि एक्स (ट्विटर)चे माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एलॉन मस्क यांना कोर्टात खेचलं आहे. सोमवारी काही अधिकाऱ्यांनी कोर्टात एलॉन मस्क यांच्या विरोधात खटला दाखल केला आहे. यामध्ये एक्स (ट्विटर)चे माजी सीईओ पराग अग्रवाल, माजी सीएफओ नेड सेगल, माजी चीफ लीगल ऑफिसर (मुख्य कायदेशीर सल्लागार) विजया गड्डे आणि माजी जनरल काउंसिल सेन एजेट यांचा समावेश आहे.

### मस्कला ट्विटर खरेदी करावे लागले

» कॅलिफोर्नियाच्या नॉर्दर्न डिस्ट्रिक्टमधील फेडरल कोर्टात दाखल करण्यात आलेल्या खटल्यात म्हटले आहे की, "कोणतेही बिल न भरणे हा मस्कच्या स्वभावाचा एक भाग आहे. लोकांचे पैसे अडकवून ठेवून एलॉन मस्क इतरांना कोर्टाचे दरवाजे ठोकण्यास भाग पडतो. आपल्यावर कोणतेही नियम लागू होत नाहीत असं त्याला वाटतं"; असे माजी अधिकारी म्हणत आहेत. मस्कने आधी ट्विटर खरेदी करण्याचा निर्णय घेतला, मात्र नंतर तो डीलमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. यावेळी ट्विटरच्या स्टेकहोल्डर्सची बाजू माजी अधिकाऱ्यांनी धरली होती, त्यामुळे एलॉन मस्कला ट्विटर खरेदी करावे लागले.

# प्री-वेडींगमधील फोटो पाहून भडकली अर्शद वारसीची पत्नी

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटचा प्री-वेडिंग सोहळा थाटामाटात पार पडला. सध्या जगभरात या सोहळ्याची चर्चा सुरू आहे. या भव्य सोहळ्यासाठी अंबानी कुटुंबाने विविध क्षेत्रांतील बड्या मंडळींना आमंत्रित केले होते. बिल गेट्स, मार्क झुकरबर्ग, इवांका ट्रम्प, जगप्रसिद्ध गायिका रिहानापासून ते बॉलीवूड आणि क्रीडा क्षेत्रातील अनेक कलाकारांनी या सोहळ्याला हजेरी लावली होती.अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मुलगी इवांका ट्रम्पही या सोहळ्याला उपस्थित होती. या सोहळ्यात इवांकाने अनेक फोटोज काढले आणि सोशल मीडियावर शेअर केले. यातला एक वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. इवांकाने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती एका मोठ्या हत्तीसमोर उभी राहिलेली दिसत आहे. या हत्तीच्या डोक्यावर सजावट केलेलीसुद्धा दिसत आहे.इवांकाचा हा फोटो पाहून अभिनेता अर्शद वारसीची पत्नी मारिया गोरेट्टी हिने तिच्या सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात मारिया म्हणाली, “अंबानींच्या सेलिब्रेशनमधील हा फोटो पाहून मी हैराण झाले. हे कोणत्याही प्राण्याबाबत घडले नाही पाहिजे, विशेषत: ज्या प्राण्यांची सुटका आणि पुनर्वसन केले जात आहे त्या प्राण्यांबाबत तर मुळीच नाही. मोठ मोठया आवाजात आणि लोकांच्या गराळ्यात या हत्तीला मधोमध उभं केलं आहे. हत्तीचा उपयोग फक्त कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी केला गेलाय.” मारिया गोरेट्टीची ही स्टोरी सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.दरम्यान, अर्शद आणि मारियाबद्दल सांगायचं झाल्यास, अर्शद वारसी आणि मारिया गोरेट्टीचं लग्न १४ फेब्रुवारी १९९९ रोजी झालं होतं. विशेष बाब म्हणजे अर्शद आणि मारिया यांनी व्हॅलेंटाइन डेच्या मुहूर्तावर लग्न केलं होतं. परंतु लग्नाची नोंदणी न केल्याने अवघ्या २५ वर्षानंतर अर्शद आणि मारियाने २३ जानेवारी २०२४ रोजी कायद्यासाठी लग्नाची नोंदणी केली.सध्या जगभरात या सोहळ्याची चर्चा सुरू आहे. या भव्य सोहळ्यासाठी अंबानी कुटुंबाने विविध क्षेत्रांतील बड्या मंडळींना आमंत्रित केले होते. अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मुलगी इवांका ट्रम्पही या सोहळ्याला उपस्थित होती. या सोहळ्यात इवांकाने अनेक फोटोज काढले आणि सोशल मीडियावर शेअर केले.

## ‘मैदान’ चित्रपटाबद्दल मोठी अपडेट समोर

बॉलिवूड अभिनेता अजय देवगण गेल्या तीन दशकांपासून आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. अजयच्या चित्रपटांची लोक आतुरतेने वाट पाहतात. तशीच त्याच्या बहुप्रतिक्षित ‘मैदान’ या चित्रपटाचीही गेली कित्येक वर्ष चर्चा आहे. गेली काही वर्ष अजयच्या आगामी ‘मैदान’ची लोक फार आतुरतेने वाट बघत आहेत परंतु प्रत्येक वेळी कोणत्या ना कोणत्या कारणाने निर्माते त्याची प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलताना दिसत आहेत.मध्यंतरी या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेबाबत मोठी अपडेट समोर आली होती. २०२४ च्या ईदला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता हे वृत्त समोर आलं होतं. इतकंच नव्हे तर हा चित्रपट अक्षय कुमार व टायगर श्रॉफच्या ‘बडे मियां छोटे मियां’ या चित्रपटाच्याबरोबरीनेच प्रदर्शित होणार असल्याचं जाहीर झालं. आता या चित्रपटाच्या ट्रेलरबद्दल नवी माहिती समोर आली आहे. निर्मात्यांनी दिलेल्या माहितीनुसार या चित्रपटाचा ट्रेलर हा ७ मार्चला प्रदर्शित होणार आहे.

## मी कोणाच्याही लग्नात नाचले नाही



अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. गुजरातमधील जामनगरमध्ये १ ते ३ मार्च दरम्यान या भव्य सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या प्री-वेडिंगसाठी संपूर्ण बॉलीवूड कलाविश्व जामनगरमध्ये अवतल्याचं पाहायला मिळालं. दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांतपासून शाहरुख, सलमान, आमिर, दीपिका असे सगळेजण बडे स्टार्स प्री-वेडिंग सोहळ्यासाठी जामनगरला पोहोचले होते. परंतु, बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखली जाणारी कंगना रणौत या प्री-वेडिंगला गैरहजर होती. कंगणा रणौत कायमच तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. कलाविश्वात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल ती नेहमीच स्वत:चं स्पष्ट मत मांडत असते. भारतरत्न दिवंगत गायिका लता मंगेशकर यांनी “तुम्ही मला ५० लाख डॉलर्स दिले तरी मी येणार नाही” असं उत्तर देत लग्नात गाण्यास नकार दिला होता. ही दीदींबद्दलची खास आठवण आशा भोसलेंनी ‘डीआयडी लिटील मास्टर्स ५’ या कार्यक्रमात सांगितली होती. यासंदर्भातील स्क्रीनशॉट शेअर करत कंगना रणौतने सोशल मीडियावर एक पोस्ट लिहिली आहे. यामध्ये अभिनेत्रीने नेमकं काय म्हटलंय जाणून घेऊयात...कंगना या पोस्टमध्ये लिहिते, “आयुष्यात मी अनेकदा आर्थिक अडचणींचा सामना केला आहे. परंतु, लताजी आणि मी आम्ही दोघीच केवळ अशा आहोत ज्यांची गाणी खूप हिट झाली आहेत. ( फॅशन का जलवा, घनी बावली हो गयी, लंडन ठुमकदा, साडी गली, विजयी भव ) आम्ही देखील लोकप्रिय आहोत, पण कोणीही कितीही आमिष दाखवलं तरीही, आजवर मी कोणाच्याही लग्नात कधीच नाचले नाही.”अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. गुजरातमधील जामनगरमध्ये १ ते ३ मार्च दरम्यान या भव्य सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या प्री-वेडिंगसाठी संपूर्ण बॉलीवूड कलाविश्व जामनगरमध्ये अवतल्याचं पाहायला मिळालं. दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांतपासून शाहरुख, सलमान, आमिर, दीपिका असे सगळेजण बडे स्टार्स प्री-वेडिंग सोहळ्यासाठी जामनगरला पोहोचले होते. परंतु, बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखली जाणारी कंगना रणौत या प्री-वेडिंगला गैरहजर होती.

## कियारा अडवाणीने घेतले तब्बल ‘एवढे’ कोटी

कियारा अडवाणी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. आपल्या अभिनयाने कियाराने अनेकांना भूरळ पाडली आहे. आत्तापर्यंत कियाराने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता लवकरच ती फरहान खान दिग्दर्शित ‘डॉन ३’ चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर रणवीर सिंहची प्रमुख भूमिका आहे. आता डॉन ३ साठी कियारा अडवाणीने किती पैसै घेतले याबाबतची माहिती समोर आली आहे. डॉन ३ चित्रपटात कियारा अडवाणी मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारणार आहे. सुरुवातीला या भूमिकेसाठी अभिनेत्री क्रिती सेनॉनचा विचार करण्यात आला होता. मात्र, आता कियाराच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे. डॉन ३ चित्रपटासाठी कियाराने तगडे मानधन घेतले असल्याची चर्चा सुरु आहे. बॉलीवुड हंगामाच्या बातमीनुसार कियाराने या चित्रपटासाठी तब्बाल १२ कोटी रुपये फी घेतली आहे. डॉन ३ साठी कियाराने आकारलेली फी ही आत्तापर्यंतच्या तिच्या मानधनापैकी सगळ्यात जास्त असल्याचे सांगण्यात येते. अभिनेत्रीने वॉर चित्रपटासाठी जेवढे मानधन घेतले होते त्याच्यापेक्षा दुप्पट मानधन तिने ‘डॉन ३’ साठी घेतले आहे.फेब्रुवारी २०२३ मध्ये डॉन ३ चित्रपटासाठी कियारा नावाची घोषणा झाली होती. फरहान अख्तरने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली होती. डॉन २ मध्ये शाहरुखबरोबर प्रियांका चोप्रा झळकली होती. त्यामुळे डॉन ३ मध्येही जंगली बिल्ली म्हणून प्रियांकाच दिसणार अशीही चर्चा होती. मात्र, शाहरुख व प्रियांकाने या चित्रपटातून काढता पाय घेतल्यानंतर रणवीर व कियाराच्या नावाची घोषणा करण्यात आली. डॉन ३ च्या माध्यमातून रणवीर व कियाराची जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.हा चित्रपट पुढील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये प्रदर्शित होणार आहे. ‘डॉन’ सिरीजमधील या अगोदरचे दोन्ही चित्रपट चांगलेच गाजले होते. चित्रपटाच्या पहिल्या भागात अमिताभ बच्चन यांनी डॉनची भूमिका साकारली होती.

## बहुचर्चित ‘मर्डर मुबारक’चा ट्रेलर प्रदर्शित



बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान नेहमीच चर्चेत असते. आपल्या अभिनयाच्या जोरावर साराने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. लवकरच साराचा ‘मर्डर मुबारक’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. या टीझरला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. आता नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे.‘मर्डर मुबारक’ चित्रपटाचे दिग्दर्शन रुचिका कपूर यांनी केले असून होमी अदजानिया यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. येत्या १५ मार्चला हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. ट्रेलरवरून हा एक सस्पेन्स कॉमेडी व मर्डर मिस्ट्री चित्रपट असल्याचे दिसून येत आहे. या चित्रपटात पंकज त्रिपाठी, सारा अली खान, करिश्मा कपूर, विजय वर्मा, टिसका चोप्रा, डिंपल कपाडिया, संजय कपूर आणि सोहेल नय्यर सारखे दिग्गज कलाकार एकत्र झळकणार आहेत. ???मुख्य म्हणजे या चित्रपटाच्या माध्यमातून करिश्मा कपूर तब्बल ११ वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे.

# अश्विनने सांगितला कारकिर्दीतला टर्निंग पॉईंट!

## 2012 ची इंग्लंडविरुद्धची मालिका माझ्यासाठी टर्निंग पॉइंट

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारताचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू रवीचंद्रन अश्विनसाठी इंग्लंडविरुद्धची धरमशाला कसोटी खास असणार आहे. ही कसोटी अश्विनची १००वी कसोटी असणार आहे. या सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत अश्विनने त्याच्या कारकिर्दीतील टर्निंग पॉईंट सांगितला आहे.पत्रकार परिषदेत अश्विनने आपल्या १०० व्या कसोटीपर्यंतच्या प्रवासातील काही आठवणींना उजाळा दिला. या पत्रकार परिषदेत रविचंद्रन अश्विनने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील नेमका टर्निंग पॉईंट काय ठरला याबद्दल सांगितले. '२०१२ मध्ये इंग्लंड संघ भारत दौऱ्यावर आला होता. इंग्लंडविरुद्धची ती कसोटी मालिका माझ्या कारकिर्दीतील टर्निंग पॉइंट ठरली.**



ज्यामुळे मला चुका सुधारण्यास मदत झाली', असं अश्विन म्हणाला. अश्विनने त्या मालिकेत ५२.४६ च्या सरासरीने तब्बल ७३७ धावा दिल्या. ॲलिस्टर कूक आणि पीटरसनच्या धुवांधार फलंदाजीमुळे त्या मालिकेत तीनवेळा त्याच्या गोलंदाजीवर शंभरहून अधिक धावा लुटण्यात आल्या. या कामगिरीमुळे अश्विनच्या कसोटी संघातील स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होतं, इंग्लंडने भारताच्या भूमीवर ही मालिका २-१ ने जिंकली, जो इंग्लिश संघासाठी भारतातील १९८४-८५ नंतरचा पहिला मालिका विजय होता.अश्विनने आपल्या १००व्या कसोटी सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत सांगितले की, '२०१२ ची इंग्लंडविरुद्धची मालिका माझ्यासाठी टर्निंग पॉइंट होती. मला कुठे सुधारणा करायची हे त्या मालिकेने मला शिकवले.' पण नंतर अश्विनच्या फिरकीने मात्र भारतीय कसोटी संघात त्याचे अढळ स्थान निर्माण केले. अश्विनने याच मालिकेत ५०० कसोटी विकेट्सचा टप्पा पूर्ण केला.

१०० वा कसोटी सामन्याबद्दल अश्विन म्हणाला,'हा खूप खास प्रसंग आहे. १०० व्या कसोटी सामन्यापेक्षाही माझा इथपर्यंत पोहोचण्याचा प्रवास खास होता. मात्र, १०० वा कसोटी सामना असला तरी त्यासाठी माझ्या तयारीत कोणताही बदल झालेला नाही.आम्हाला धरमशाला कसोटी जिंकायची आहे' .

त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरीबद्दल त्याला विचारले असता तो म्हणाला, 'मी २०१८-१९ मध्ये बर्मिंगहॅममधील कसोटीत कारकिर्दीतील सर्वोत्तम स्पेल टाकला होता.' नुकताच ५०० कसोटी विकेट पूर्ण करणारा अनिल कुंबळेनंतरचा दुसरा भारतीय गोलंदाज ठरलेल्या अश्विनने २०११ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

या भारताच्या सर्वोत्कृष्ट फिरकीपटूने त्याच्या या प्रवासात कुटुंबाच्या भूमिकेबद्दल बोलताना सांगितले, 'माझ्या मुली माझ्यापेक्षा जास्त उत्साहित आहेत.

शंभरावी कसोटी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे, परंतु माझ्या वडिलांसाठी, आईसाठी, पत्नीसाठी आणि अगदी माझ्या मुलांसाठी ती अधिक महत्त्वाची आहे.

माझी मुलं या १०० व्या कसोटीसाठी अधिक उत्सुक आहेत'. अश्विन म्हणाला, 'खेळाडूच्या वाटचालीत कुटुंबाला खूप काही सहन करावे लागते. तुमच्या मुलाने या क्रिकेट कारकिर्दीत काय काय केले याची उत्तरे देण्यासाठी माझे वडील अजूनही ४० कॉल्सना उत्तरे देतात'.

### स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले

» रवीचंद्रन अश्विन हा भारतासाठी मायदेशातील कसोटीत सर्वात मोठा सामनाविजेता ठरला आहे. गोलंदाजीच्या बरोबरीने फलंदाजीतही त्याने योगदान दिलं आहे. कसोटी क्रिकेटमध्ये अश्विनने ५ शतकं झळकावली आहेत.भारताचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू रवीचंद्रन अश्विनसाठी इंग्लंडविरुद्धची धरमशाला कसोटी खास असणार आहे. ही कसोटी अश्विनची १००वी कसोटी असणार आहे. या सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत अश्विनने त्याच्या कारकिर्दीतील टर्निंग पॉईंट सांगितला आहे.पत्रकार परिषदेत अश्विनने आपल्या १०० व्या कसोटीपर्यंतच्या प्रवासातील काही आठवणींना उजाळा दिला. या पत्रकार परिषदेत रविचंद्रन अश्विनने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील नेमका टर्निंग पॉईंट काय ठरला याबद्दल सांगितले. '२०१२ मध्ये इंग्लंड संघ भारत दौऱ्यावर आला होता. इंग्लंडविरुद्धची ती कसोटी मालिका माझ्या कारकिर्दीतील टर्निंग पॉइंट ठरली. अश्विनने त्या मालिकेत ५२.४६ च्या सरासरीने तब्बल ७३७ धावा दिल्या.ॲलिस्टर कूक आणि पीटरसनच्या धुवांधार फलंदाजीमुळे त्या मालिकेत तीनवेळा त्याच्या गोलंदाजीवर शंभरहून अधिक धावा लुटण्यात आल्या. या कामगिरीमुळे अश्विनच्या कसोटी संघातील स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होतं.

# रणजी करंडक स्पर्धा : मुंबईपुढे तमिळनाडूची शरणागती!

## तनुष कोटियन आणि शार्दूल ठाकूर यांची अष्टपैलू कामगिरी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**तनुष कोटियन आणि शार्दूल ठाकूर यांची अष्टपैलू कामगिरी, तसेच डावखुरा फिरकीपटू शम्स मुलानीने दुसऱ्या डावात केलेल्या प्रभावी माऱ्याच्या जोरावर मुंबईने उपांत्य फेरीत तमिळनाडूचा तीन दिवसांतच एक डाव आणि ७० धावांनी धुव्वा उडवत रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली.**

वांद्रे कुर्ला संकुल येथील 'एमसीए' अकादमीच्या मैदानावर झालेल्या उपांत्य सामन्यात मुंबईने पहिल्या डावात ३७८ धावांची मजल मारताना २३२ धावांची आघाडी मिळवली होती. याच्या प्रत्युत्तरात तमिळनाडूच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावातही मुंबईच्या गोलंदाजांपुढे शरणागती पत्करली. तमिळनाडूचा दुसरा डाव १६२ धावांतच संपुष्टात आला. त्यामुळे मुंबईने मोठ्या विजयासह ४८व्यांदा रणजी करंडकाची अंतिम फेरी गाठली. शार्दूल ठाकूर आणि तनुष कोटियन हे मुंबईच्या या शानदार विजयाचे शिल्पकार ठरले. पहिल्या डावात मुंबईचा संघ अडचणीत असताना शार्दूलने १०५ चेंडूंत १०९ धावांची अप्रतिम खेळी साकारली. तसेच उपांत्यपूर्व सामन्यात बडोदाविरुद्ध १०व्या क्रमांकावर येत शतक साकारणाऱ्या कोटियनने आपली लय कायम राखताना तमिळनाडूविरुद्ध १२६ चेंडूंत १२ चौकारांच्या मदतीने नाबाद ८९ धावा केल्या. त्याला ११व्या क्रमांकावरील तुषार देशपांडेने (६० चेंडूंत २६) सुरेख साथ दिली.



त्यामुळेच मुंबईला पहिल्या डावात द्विशतकी आघाडी घेता आली. अखेरच्या दोन जोड्यांनी मिळून मुंबईच्या धावसंख्येत १६७ धावांची भर घातली. त्यानंतर मोठ्या फरकाने पिछाडीवर असलेल्या तमिळनाडूला फलंदाजांकडून दमदार कामगिरीची गरज होती. मात्र संपूर्ण हंगामात चमकदार कामगिरी केलेल्या या फलंदाजांचा मुंबईच्या गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. फलंदाजीतील महत्त्वपूर्ण योगदानानंतर शार्दूल आणि कोटियन यांनी गोलंदाजीत दुसऱ्या डावात प्रत्येकी दोन गडी बाद केले. तर अनुभवी फिरकीपटू मुलानीने ५३ धावांच्या मोबदल्यात सर्वाधिक चार बळी मिळवले. दुसऱ्या डावात तमिळनाडूची सुरुवातच निराशाजनक झाली. शार्दूलने तमिळनाडूचे सलामीवीर एन. जगदीशन (०) आणि साई सुदर्शन (५) यांना झटपट माघारी धाडले. तर तिसऱ्या क्रमांकावर बढती मिळालेल्या वॉशिंग्टन सुंदरचा (४) अडसर मोहित अवस्थीने दूर केला. त्यामुळे तमिळनाडूची ३ बाद १० अशी स्थिती झाली. बाबा इंद्रजित (१०५ चेंडूंत ७०) आणि प्रदोष रंजन पॉल (५४ चेंडूंत २५) यांनी ७३ धावांची भागीदारी रचताना तमिळनाडूचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, ऑफ-स्पिनर कोटियनने प्रदोषला बाद करत तमिळनाडूला चौथा धक्का दिला.

### अंतिम सामना वानखेडेवर

» काही काळाने अवस्थीने इंद्रजितला माघारी धाडले. यानंतर कोटियन आणि मुलानी यांनी प्रभावी फिरकी गोलंदाजी करताना तमिळनाडूचा डाव गुंडाळला. तमिळनाडूने अखेरचे पाच गडी नऊ धावांतच गमावले.मुंबई आणि तमिळनाडू यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना वांद्रे कुर्ला संकुल येथील शरद पवार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झाल्याने मुंबईकर क्रिकेटप्रेमींचा हिरमोड झाला. मात्र, आता रणजी करंडकाच्या अंतिम सामन्याचे महत्त्व लक्षात घेता हा सामना ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर खेळवण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे, असे मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) सचिव अजिंक्य नाईक यांनी सोमवारी सांगितले. हा सामना १० ते १४ मार्च या कालावधीत खेळवला जाणार आहे.